**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातमीपत्र**

**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:27.05.2024 वार:सोमवार**

1.शिक्षणाला मूल्य,नीतिमत्ता आणि मानवतेची जोड देणं गरजेचं - राज्यपाल रमेश बैस यांचं प्रतिपादन

2.राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर होणार

3.मुंबईतल्या अनधिकृत पब आणि बारवर कारवाईची मुख्यमंत्र्यांची सूचना आणि

4.आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स विजयी

**राज्यपाल**

शिक्षणाला मूल्यांची जोड नसली तर ते शिक्षण केवळ व्यक्तीचा अहंकार वाढवते. त्यामुळं शिक्षणाला मूल्य, नीतिमत्ता आणि मानवतेची जोड देणं गरजेचं आहे,असं प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केलं आहे. ते काल मुंबईत रामकृष्ण मठ आणि मिशनच्या शताब्दी वर्षाच्या सांगता समारंभात बोलत होते. रामकृष्ण मिशननं शाळांशी सहकार्य प्रस्थापित करून विद्यार्थ्यांना संस्कारित करावं,असं आवाहन राज्यपालांनी यावेळी केलं. रामकृष्ण मिशन मुंबई केंद्राने गरीब आणि वंचित महिलांसाठी कौशल्य विकास उपक्रम राबवून त्यांना आत्मनिर्भर बनवावे, असे आवाहन बैस यांनी केले. विविध आजारांच्या उपचारासाठी मुंबईत येणाऱ्या रुग्णांसाठी आणि त्यांच्या नातलगांसाठी निवासी व्यवस्था असलेलं 'माँ शारदा भवन' निर्माण केल्याबद्दल राज्यपालांनी रामकृष्ण मिशनच्या कार्याचं कौतुक केलं. या कार्यक्रमाला रामकृष्ण मिशनच्या बेलूर मठाचे उपाध्यक्ष स्वामी दिव्यानंद, मुंबई रामकृष्ण मठाचे अध्यक्ष सत्यदेवानंद यांच्यासह रामकृष्ण मठाच्या विविध केंद्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**प्रचार**

लोकसभेच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यासाठीचा प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. विविध राजकीय पक्षांचे मातब्बर नेते आपापल्या पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेत आहेत. या अखेरच्या टप्प्यात येत्या 1 जून रोजी मतदान होणार असून सर्व ठिकाणची मतमोजणी 4 जूनला होणार आहे. विधानसभा-मुंबईmu राज्यात विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या होणार असलेल्या निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं दोन उमेदवारांची घोषणा

केली आहे. मुंबई पदवीधर मतदारसंघातून अनिल परब आणि मुंबई शिक्षक मतदारसंघातून जे. एम. अभ्यंकर यांना पक्षानं उमेदवारी दिली आहे.

## पब कारवाई

पुण्यातल्या कल्याणी नगरमधील कार अपघात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मुंबईतही अनधिकृत पब आणि बारवर कारवाई करण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या असून जे पब किंवा बार मर्यादित वेळेपेक्षा जास्त काळ सुरु राहतील त्यांच्यावर सुद्धा कारवाई होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. ते काल मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. पुणे प्रकरणात आपण स्वतः पोलीस आयुक्तांशी बोललो असून कायद्यापुढे सगळे समान आहेत. या प्रकरणात जे जे दोषी असतील त्या सगळ्यांवर कारवाई होईल, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

## दारू

नंदूरबार जिल्ह्यात पिंगाणे गावाजवळ काल एक ट्रॅक्टर उलटून अपघात झाल्यानंतर त्यात फरशींच्या आडून अवैधरित्या दारुची वाहतूक होत असल्याचं आढळून आलं. अपघातात ट्रॅक्टरचालक ठार झाला तर रस्त्यावर पडलेली दारुची खोकी लोकांनी पळवून नेली. ही दारु बनावट असल्याचा संशय आहे. दरम्यान नंदूरबार जिल्ह्यातच केंद्रीय अमली पदार्थ विरोधी विभागाच्या मध्य प्रदेशातील पथकानं अमली पदार्थांची वाहतूक होत असलेलं एक वाहन पाठलाग करुन ताब्यात घेतलं आहे. गाडीचा क्रमांक दिल्लीचा आहे.

## नाले सफाई पाहणी

पावसाळ्यात मुंबईत कुठेही पाणी तुंबू नये, यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात आल्या असून महापालिकेकडून मुंबईतील नालेसफाई युद्धपातळीवर सुरु असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. मुंबईत सर्वत्र सुमारे ५४ हजार २२५ वाहनाचा वापर करून गाळ काढण्याचे काम करण्यात येत असून हिंदमाता, मिलन सबवे सारख्या ठिकाणी ४८२ पंप लावण्यात आले आहेत,असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. याशिवाय दरड कोसळण्याच्या ठिकाणांचा आढावा घेण्यात आला असून त्या भागात राहणाऱ्या नागरिकांना एमएमआरडीएच्या घरांमध्ये राहण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात येणार आहे. प्रशासनाला योग्य त्या सूचना करण्यात आल्या असून नागरिकांनीही सहकार्य करावं असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं आहे.

## दहावी निकाल

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं यावर्षी मार्चमध्ये घेतलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर होणार आहे. दुपारी एक वाजता मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर निकाल पाहता येईल. गुणपडताळणीसह गुणपत्रिका छायाप्रतींसाठी २८ मे पासून ११ जूनपर्यंत संकेतस्थळावरच ऑनलाइन पद्धतीनं अर्ज सादर करता येईल.

**छापे**

प्राप्तिकर विभागानं काल देशात विविध ठिकाणी छापे टाकले. नाशिकमध्ये एका सराफा दुकानातही काल छापा टाकण्यात आला. यावेळी २६ कोटी रुपयांची रोकड आणि ९० कोटी रुपयांच्या बेहिशोबी मालमत्तेचे दस्तऐवज जप्त केले असल्याची माहिती वृत्त संस्थेनं दिली आहे.

**घाटकोपर**

मुंबईतल्या घाटकोपर जाहिरात फलक दुर्घटनेप्रकरणी अटकेत असलेला आरोपी भावेश भिंडे यांच्या पोलीस कोठडीत महानगर दंडाधिकारी न्यायलयानं २९ मेपर्यंत वाढ केली आहे. भिंडे याला १६ मे रोजी राजस्थानमधल्या उदयपूर इथून पोलिसांनी अटक केली. त्याच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्यानं काल त्याला पुन्हा न्यायालयासमोर हजर करण्यात आलं. घाटकोपर इथं १३ मे रोजी झालेल्या या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला.

**कारवाई-**

पुण्यातल्या बाणेर इथल्या रूफ टॉप हॉटेल, पत्राशेड आणि अनधिकृत बांधकामांवर पुणे महापालिकेच्या बांधकाम विकास विभागानं पोलीस पथकाच्या मदतीनं धडक कारवाई केली. याशिवाय बाणेरमधल्या नऊ रुफटॉप हॉटेलवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती महापालिकेनं दिली आहे.

**पोलिस कारवाई**

मद्यपान करून गाडी चालवणाऱ्या चालकांवर पुणे पोलिसांनी नाकाबंदी करून कारवाई केली. शनिवारी रात्री केलेल्या या कारवाईत १४०९ चालकांची तपासणी केली; यामध्ये ११७ चालक मद्यपान करून गाडी चालवत असल्याचं आढळून आलं. याशिवाय वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या २६२  चालकांकडून अडीच लाख रुपये दंड वसूल करण्यात आल्याची माहिती पुणे पोलिसांनी दिली.

**मसाप**

लेखणी स्वतंत्र असेल तेव्हाच ती सत्तेवर आणि सत्ताधाऱ्यांवर अंकुश राखू शकते, असं प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक आणि साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांनी काल पुण्यात केलं. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या ११९व्या वर्धापनदिनानिमित्तानं विशेष ग्रंथकार आणि वार्षिक ग्रंथ पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कौशिक बोलत होते. समाजामध्ये संवेदनशीलता वाढावी, माणसामध्ये गुणात्मक परिवर्तन व्हावं हाच साहित्यिकाच्या लेखनाचा उद्देश असतो, असंही  कौशिक यावेळी म्हणाले.

**विज्ञानविदुषी**

मुंबईतील टाटा मुलभूत संशोधन संस्था आणि होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राद्वारे 'विज्ञान विदुषी' २०२४ भौतिकशास्त्र या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. हा तीन आठवड्यांचा निवासी कार्यक्रम असून आजपासून १५ जून पर्यंत सुरू राहणार आहे. भौतिकशास्त्रात पीएच्.डी.च्या संशोधनासाठी पुरुष संशोधकांबरोबर महिला संशोधकांना प्रोत्साहन आणि पाठबळ देणं, हा या उपक्रमाचा हेतू असून एम. एससी.प्रथम वर्ष पूर्ण केलेल्या ४६ विद्यार्थिनी यामध्ये सहभागी होणार आहेत. या विद्यार्थिनींना भौतिकशास्त्रातील प्रगत अभ्यासक्रम शिकवले जातील तसंच नाविन्यपूर्ण प्रयोग करायला प्रोत्साहन दिलं जाईल.

**सिंचन प्रकल्प कोरडे**

बीड जिल्ह्यातील विविध १६६ सिंचन प्रकल्पांमध्ये पाण्याची स्थिती बिकट झाल्यामुळं वडवणी, धारुर आणि अंबाजोगाई या तालुक्यांमध्ये गंभीर स्वरुपाचा दुष्काळ तर बीड, गेवराई, शिरुर, माजलगाव, केज, परळी, आष्टी आणि पाटोदा या तालुक्यातील महसुली मंडळामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्याचं जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी घोषित केलं आहे. जिल्ह्यातील ७ लाखाहून अधिक लोकांना ४३३ टँकरनं पाणी पुरवठा केला जात आहे. जिल्ह्यातील ६६५ खासगी विहिरी आणि कुपनलिका प्रशासनानं ताब्यात घेतल्या आहेत.

**गाळयुक्त शिवार**

लातूर जिल्ह्यात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानाला गती देण्यात आली आहे. पावसाळ्यापूर्वी जास्तीत जास्त सिंचन प्रकल्पातील गाळ उपसा करण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. लातूर तालुक्यातील धानारी इथल्या तावरजा मध्यम प्रकल्पातील गाळ उपशाच्या कामाला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते काल प्रारंभ झाला. नाम फाऊंडेशनच्या सहकार्यातून हा गाळ उपसा सुरू आहे. जिल्ह्यातील जवळपास ५२ ठिकाणी लोकसहभाग आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून ही कामं सुरु आहेत.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटच्या अंतिम सामन्यात, कोलकाता नाइट रायडर्सनं सनरायझर्स हैदराबादचा 8 गडी राखून पराभव केला. चेन्नई इथं काल रात्री सनरायझर्सनं दिलेल्या 114 धावांचं तुटपुंजं लक्ष्य कोलकातानं अकराव्या षटकांत 2 गड्यांच्या बदल्यात पार केलं. मिचेल स्टार्कला सामनावीर घोषित करण्यात आलं.

**पाऊस**

बुलडाणा जिल्ह्यात काल दुपारी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. अनेक ठिकाणी विजेचे खांब पडले. खामगाव शहरानजीक धावत्या बसवर पत्र्याची शेड कोसळली, यात काहीजण जखमी झाले. शेगाव इथं वीज पडून एका मुलाचा मृत्यू झाला.

बीड जिल्ह्यात आंबाजोगाई इथंही काल वादळी वाऱ्यासाह पाऊस झाला, यात अनेक घरांचं नुकसान झालं.

जळगाव जिल्ह्यात रावेर तालुक्यात शनिवारी झालेल्या पावसाने केळीच्या पिकाचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे.

सोलापूर जिल्ह्यातही काल संध्याकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे उकड्याने हैराण झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला.

पालघर जिल्ह्यात तापमानाचा पारा वाढत आहे. त्यात बोईसर आणि त्या जवळच्या अनेक भागात वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्यानं नागरिक त्रस्त झाले आहेत.

**हवामान**

राज्याच्या अनेक भागांमध्ये उष्णतेची लाट कायम आहे. मराठवाडा आणि विदर्भात सर्वत्र पारा 40 अंशांच्या पार आहे. मध्य महाराष्ट्रात जळगाव वगळता अन्य शहरांचं तापमान 40 अंशांच्या खाली आलं आहे. यवतमाळ इथं सर्वाधिक 46 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.